मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमधील 398 बांधकाम प्रकल्पांवर टांगती तलवार

## प्रशासकीय चुकीचा फटका हजारो सर्वसामान्यांना; संपूर्ण शहरात चिंतेचे वातावरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराच्या विकास आराखड्यातील (डीपी) तांत्रिक घोळामुळे सध्या शहरातील हजारो नागरिकांच्या स्वप्नातील घरावर टांगती तलवार निर्माण झाली आहे. महापालिका प्रशासनाने केलेल्या एका गंभीर चुकीची शिक्षा आता सामान्य नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांना भोगावी लागत असून, यामुळे संपूर्ण शहरात चिंतेचे वातावरण पसरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने काही वर्षांपूर्वी ज्या जागांवर कायदेशीररीत्या बांधकाम परवानगी दिली होती, त्याच जागांवर आता रस्ते किंवा इतर विकास प्रकल्पांची आरक्षणे दर्शवण्यात आली आहेत. प्रशासनाच्या या विसंगत धोरणामुळे सध्या सुरू असलेले सुमारे ३९८ बांधकाम प्रकल्प बाधित झाले आहेत. पालिकेच्या या तांत्रिक चुकीमुळे हजारो घरांच्या हक्कावर आणि त्यांच्या कायदेशीर नोंदणीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या गंभीर विषयावर आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत आवाज उठवला होता, ज्याची दखल घेत प्रशासनाने आपली तांत्रिक चूक मान्य केली आहे. ही चूक दुरुस्त करण्यासाठी राज्य शासनाकडे प्रस्तावही धाडण्यात आला आहे, मात्र महिना उलटूनही राज्य नगरविकास विभागाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही.

या प्रशासकीय दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट असून, या विषया संदर्भात महापालिकेत तब्बल ५०,००० हरकती दाखल झाल्या आहेत. प्रशासनाच्या या चुकीची शिक्षा सामान्य नागरिकांनी का भोगावी, असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. जोपर्यंत राज्य शासन स्तरावर यावर अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत या बाधित प्रकल्पांमधील घरांचे भवितव्य अधांतरीच राहणार आहे.


> **"जोपर्यंत राज्य शासन स्तरावर काही अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत या ३९८ प्रकल्पांमध्ये टांगती तलवार कायम राहणार आहे."**
>
> **- सुनिल भागवानी,सह शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर यमुनानगर जलतरण तलाव नागरिकांसाठी खुला

## जलतरण तलाव सुरू करण्यासाठी शिवसेना नगरसेविका सुलभा उबाळे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.

**पिंपरी | प्रतिनिधी**

यमुनानगर परिसरातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी समोर आली असून, अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेला बहुचर्चित यमुनानगर जलतरण तलाव अखेर नागरिकांसाठी खुला करण्यात आला. या तलावाच्या उद्घाटनाचा सोहळा उत्साहात पार पडला. हा जलतरण तलाव सुरू करण्यासाठी शिवसेना नगरसेविका सुलभा उबाळे यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.



जलतरण तलावाच्या उद्घाटन समारंभाला नगरसेविका सुलभा उबाळे तसेच नगरसेवक नगरसेवक बापू घोलप, उत्तम केंदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद व्यक्त केला. नवीन सुरू झालेल्या या जलतरण तलावात नागरिकांना पोहण्यासोबतच व्यायामाची सुविधा उपलब्ध होणार असून कुटुंबीयांसोबत विरंगुळा घालवण्यासाठीही हे ठिकाण आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

प्रशासनाकडून तलावाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित आणि आनंददायी अनुभव मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. दरम्यान, शहरातील नागरिकांसाठी हा जलतरण तलाव विशेषतः उन्हाळा आणि पावसाळ्यात थंडावा देणारे आदर्श मनोरंजन स्थळ ठरेल, अशी माहिती नगरसेविका सुलभा उबाळे यांनी दिली.

# रस्ते दुरुस्तीशिवाय मेट्रोला निधी नाही; महापालिकेचा ठाम निर्णय

## निगडी-पिंपरी मार्गावरील सेवा रस्त्यांची दुरवस्था; काम सुधारल्याशिवाय निधी रोखणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी ते पिंपरी या मार्गावर महामेट्रोकडून सुरू असलेल्या कामामुळे सेवा रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली आहे. त्यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांची गैरसोय होत आहे. ते रस्ते दुरुस्त केल्याशिवाय मेट्रोला महापालिका निधी देणार नाही, असा निर्णय स्थायी समिती सभेच्या बुधवारी (दि. 8) झालेल्या सभेत घेतला. अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते.

पिंपरी ते निगडी मेट्रोच्या विस्तारित मार्गाचे काम सुरू आहे. ते काम आत्तापर्यंत 55 टक्के पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाच्या 960 कोटी 18 लाख खर्चापैकी महापालिका 146 कोटी 91 लाखांचा निधी देणार आहे. त्यापैकी 49 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. तर, 50 कोटी रुपये दिले असून, त्याला मान्यता देण्याचा विषय स्थायी समितीसमोर होता. मात्र, निगडी ते चिंचवडपर्यंतचे रस्ते दुरुस्त केल्याशिवाय मंजुरी न देण्याचा निर्णय समितीने घेतला. त्यामुळे तो विषय पुन्हा तहकूब केला.

महापारेषण कंपनीचे 132 के.व्ही. व्हॅटचे दोन मनोरे (टॉवर) रावेत इंद्रप्रभा सोसायटी येथील रस्तारुंदीकरणास अडथळा ठरत आहेत. ते टॉवर हटविण्यास 21 लाख 55 हजार रुपये खर्च केला जाणार आहे. निगडी, सेक्टर क्रमांक 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रातील विविध केमिकल टाक्यांना सुरक्षा आवरण उभारणे. मोशी-बोऱ्हाडेवाडी परिसरात स्थापत्यविषयक कामे, नाल्यांची व पावसाळी चेंबर्सची साफसफाई करणे. रावेत, किवळे, मामुर्डी, विकासनगर, साईनगर, कोतवालनगर येथे रस्ते दुरुस्ती करणे. महापालिका इमारत इतर आवश्यक ठिकाणांची देखभाल-दुरुस्ती करणे. नवीन थेरगाव, जिजामाता, भोसरी, तालेरा रुग्णालय, आकुर्डी रुग्णालयात कार्यरत तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्यास देणे. आदी खर्चास समितीने मान्यता दिली.




### स्मार्ट सिटीचा सव्वादोन कोटींचा भार महापालिकेवर

» पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनीच्या प्रकल्पांतर्गत जीआयएस इनॅबेल ईआरपीकरिता व्हर्च्युअल मशिन उपलब्ध करून देण्याचे आदेश 15 मार्च 2024 ला टेक नाईन सर्व्हिसेसला देण्यात आले आहेत. तो प्रकल्प स्मार्ट सिटीने महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे 9 मार्च 2026 ला वर्ग केला आहे. त्यापूर्वी 4 जून 2025 पासून त्या कामास एका वर्षाची मुदतवाढ देण्यास आयुक्तांनी मान्यता दिली. त्यासाठी 2 कोटी 20 लाख 7 हजार 252 रुपये खर्च होणार आहे. तो खर्चास स्थायीने मान्यता दिली आहे.

### रस्ते दुरुस्तीशिवाय निधी नाही

» पिंपरी-चिंचवडमध्ये निगडी ते पिंपरी मार्गावरील मेट्रो कामामुळे सेवा रस्त्यांची मोठी दुरवस्था झाली असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती केल्याशिवाय मेट्रो प्रकल्पासाठी महापालिकेकडून पुढील निधी मंजूर केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे संबंधित यंत्रणांवर काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी दबाव निर्माण झाला आहे.

### संतपीठाला एक कोटीचा धनादेश

» महापालिकेचे चिखली येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ सीबीएसई इंग्रजी माध्यम शाळा आहे. संतपीठासाठी असलेली माध्यमिक शिक्षण विभागाची सन 2025-26 मधील 1 कोटी रुपयांची तरतूद खर्च झालेली नाही. तो निधी संतपीठाच्या बँक खातावर वर्ग करण्याची मागणी संतपीठाने केली होती. त्यानुसार ती रक्कम धनादेशाद्वारे अदा केली आहे.

# पिंपळे निलखमध्ये वाहतूक कोलमडली; रक्षक चौकात अतिक्रमणांचा विळखा

## सायकल ट्रॅकवर दुचाकींचा सुळसुळाट, फ्लायओव्हर रखडल्याने नागरिक त्रस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे निलख ते सांगवी फाटादरम्यानच्या रक्षक चौक परिसरात वाहतूक शिस्तीचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. स्मार्ट सिटीच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेले सायकल ट्रॅक आणि पादचारी मार्ग हेच आता दुचाकीस्वारांच्या अतिक्रमणाचे केंद्र बनले असून, त्यातच वाढलेले रस्त्यावरील अतिक्रमण आणि रखडलेले फ्लायओव्हरचे काम यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे

सायकल ट्रॅकवर दुचाकींचा सुळसुळाट हा येथे दररोजचाच प्रकार बनला आहे. सायकलस्वारांना मागून मोठमोठ्याने हॉर्न वाजवत बाजूला होण्यास भाग पाडले जात असल्याने सुरक्षिततेसाठी उभारलेला हा मार्गच धोकादायक ठरत आहे. पादचारी मार्गाची परिस्थितीही बिकट झाली असून, दुचाकींच्या अतिक्रमणामुळे नागरिकांना रस्त्यावर उतरून चालावे लागत आहे.

यामध्ये भर घालणारा आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे रस्त्यावरील अनधिकृत अतिक्रमण. रक्षक चौक परिसरात मोठ्या प्रमाणात हातगाड्या, फळ आणि कपडे विक्रेते आणि विविध स्टॉल्स उभे राहत असल्याने आधीच कोंडीने त्रस्त असलेल्या रस्त्यावर अधिकच ताण निर्माण होत आहे. या अतिक्रमणामुळे वाहनांची हालचाल मंदावतेच, पण अपघाताचा धोकादेखील मोठ्या प्रमाणात वाढत आहे. फ्लायओव्हरचे काम सुरू असल्याने अगोदरच रस्ता अरुंद झाला आहे, त्यात या हातगाड्यांमुळे परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिसरात विद्युत खांबांजवळील बॉक्स उघडे पडल्याचेही निदर्शनास आले आहे. केबल्स उघड्या अवस्थेत असल्याने पावसाळ्यात विद्युत प्रवाह बाहेर येण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.



### उपाययोजना करण्याची मागणी

» दरम्यान, रक्षक चौकातील फ्लायओव्हरचे कामही संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांच्या नाराजीत भर पडली आहे. अनेक महिन्यांपासून सुरू असलेले हे काम वर्ष उलटूनही पूर्ण झालेले नाही. परिणामी वाहतूककोंडी वाढत असून, हा पूल नेमका कधी नागरिकांच्या सेवेत येणार, याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकीकडे स्मार्ट सिटीच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा केल्या जात असताना दुसरीकडे प्रत्यक्षात मूलभूत सुविधांची अशी दुर्दशा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रक्षक चौक परिसरातील ही परिस्थिती केवळ वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न नसून, प्रशासनाच्या निष्क्रियतेचे जिवंत उदाहरण ठरत आहे. आता तरी संबंधित यंत्रणा जागी होऊन ठोस उपाययोजना करणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# पुण्यात पाणी कपातीचे संकट; 15 टक्के कपातीचे आदेश जारी

## जलसंपदा विभागाचे महापालिकेला पत्र, 31 ऑगस्टपर्यंत साठा पुरवण्यासाठी जलसंपदा विभाग ॲक्शन मोडमध्ये.

**पुणे | प्रतिनिधी**

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे आधीच घरगुती गॅस टंचाईचा सामना करणाऱ्या पुणेकरांसमोर आता नवीन संकट उभे ठाकले आहे. हवामान विभागाने यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता वर्तवल्याने, तसेच खडकवासला प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत पुरविण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून जलसंपदा विभागाने पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेसह एमआयडीसीला दरमहा १५ टक्के पाणी कपात करण्याचे निर्देश दिले आहेत.

यामुळे पुणेकरांना आता उन्हाळ्याच्या तीव्र झळांसोबतच पाणीटंचाईचाही सामना करावा लागण्याची शक्यता आहे. अल-निनो आणि आयओडीच्या प्रभावामुळे मान्सून कमी राहण्याबाबत चर्चा झाली होती. जलसंपदा मंत्र्यांच्या सूचनेनुसार, भविष्यात अवर्षणप्रवण परिस्थिती निर्माण झाल्यास पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी आतापासूनच काटेकोर नियोजनाचे आदेश दिले आहेत.




### दिवसाला ३०० एमएलडी पाणी कमी

» कपातीमुळे पुणे शहराला दररोज सुमारे २५० ते ३०० एमएलडी पाणी कमी मिळणार आहे. सध्या खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांमध्ये मिळून १३.२० टीएमसी पाणीसाठा आहे. मागील वर्षाच्या तुलनेत साठा जास्त असला तरी भविष्यातील अनिश्चिततेमुळे प्रशासन सतर्क झाले आहे. या पार्श्वभूमीवर जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी महापालिकेला तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश दिले आहेत.

जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी महापालिकेला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे, की पाणी कपात न केल्यास भविष्यात निर्माण होणाऱ्या टंचाईला सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहतील. दरम्यान, या पत्राची महापालिका आयुक्तांनी गांभीर्याने दखल घेत येत्या शुक्रवारी (दि. १०) जलसंपदा विभाग आणि महापालिकेची संयुक्त बैठक बोलावली आहे.

पुणे शहराला खडकवासला धरण साखळी प्रकल्पातून म्हणजेच खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांतून पाणीपुरवठा केला जातो. सध्या या चारही धरणांमध्ये मिळून १३.२० टीएमसी म्हणजेच ४५.२९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच दिवशी १२.०४ टीएमसी साठा होता. यंदा १.१६ टीएमसी साठा जादा असला, तरी भविष्यातील अनिश्चिततेमुळे कपात अटळ मानली जात आहे.

जलसंपदा विभागाकडून उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन ३१ ऑगस्टपर्यंत करण्यात येते. पुणे शहराला दरमहा सव्वा ते दीड टीएमसी पाण्याची गरज लागते. १५ टक्के कपात लागू झाल्यास दिवसाला सुमारे २५० ते ३०० एमएलडी पाणी कमी मिळणार आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे आणि त्यात १५ टक्के कपातीची टांगती तलवार असताना, महापालिका प्रशासन नेमकी अंमलबजावणी कशी करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शहराच्या काही भागांत आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना, अधिकच्या कपातीमुळे पुणेकरांना मोठ्या पाणीटंचाई सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

### कपातीचा निर्णय अनिवार्य

» पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरासाठी जलसंपदा विभागाने दरमहा १५ टक्के पाणी कपातीचे निर्देश दिले आहेत. हवामान खात्याने यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता वर्तवल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. खडकवासला धरण साखळीतील पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत पुरविण्यासाठी ही खबरदारी घेतली जात आहे. या निर्णयामुळे नागरिकांना पाणी वापरात काटकसर करावी लागणार आहे.

### टंचाई टाळण्यासाठी नियोजन गरजेचे

» उन्हाळ्याची तीव्रता आणि कमी पाऊस यामुळे शहरात पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. काही भागांत आधीच कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून, कपात लागू झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने योग्य नियोजन करून नागरिकांना दिलासा देणे आवश्यक ठरणार आहे.


# पुणे बाणेरमध्ये पासपोर्ट केंद्रामुळे वाहतूक कोंडी; उपायांसाठी बैठक

## पार्किंग, अतिक्रमण व वाहतूक समस्यांवर लवकरच मास्टर प्लॅन तयार होणार

**पुणे | प्रतिनिधी**

बाणेर-पाषाण लिंक रोड परिसरात नव्याने सुरू झालेल्या पासपोर्ट सेवा केंद्रामुळे निर्माण होत असलेल्या वाहतूक कोंडी, पार्किंग, अतिक्रमण व परिसरातील वाहतूक व्यवस्थापनाच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी नगरसेवक सनी निम्हण यांच्या पुढाकाराने बुधवारी (दि. ८) औंध क्षेत्रीय कार्यालयात संयुक्त समन्वय बैठक पार पडली.

या बैठकीत औंध क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी विजय नायकल, पासपोर्ट कार्यालयाचे प्रतिनिधी जतिन पोटे, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेविका रोहिणी चिमटे, भक्ती गायकवाड, राहुल कोकाटे, सहायक पोलिस निरीक्षक प्रसाद डोंगरे, बाणेर-पाषाण लिंक रोड परिसरातील नागरिक तसेच पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.




बैठकीदरम्यान पासपोर्ट सेवा केंद्र सुरू झाल्यानंतर परिसरात उद्भवलेल्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः वाहतूक कोंडी, अनधिकृत पार्किंग, रस्त्यावरील अतिक्रमणे, पादचारी सुरक्षितता, वाहतूक नियंत्रण, नागरिकांसाठी आवश्यक सुविधा आदी मुद्द्यांवर सर्वंकष आढावा घेण्यात आला. पासपोर्ट कार्यालय व या ठिकाणी झालेल्या बँकेची सर्व वाहने नवीन होत असलेल्या बाणेर-पाषाण लिंक रोडवर सध्या पार्क केली जात आहे. त्याचा मोठा परिणाम या ठिकाणी वाहतूक कोंडीवर होणार असल्याचे लक्षात येत आहे. तसेच, या ठिकाणी उभारण्यात आलेल्या व्यावसायिक इमारतींना पार्किंग व्यवस्था कशी आहे, याची तपासणी करण्यात यावी. व्यावसायिक इमारतीने व्यवस्थित पार्किंग सोडलेले नसतील तर येथील आमच्या हक्काच्या आरक्षित जागा त्यासाठी वापरण्यात येऊ नयेत, अशी मागणी नागरिकांनी केली.

### पाहणी करून करणार मास्टर प्लॅन

» बाणेर-पाषाण लिंक रोडवरील व्यावसायिक इमारतीची पार्किंग व्यवस्था तपासणे गरजेचे आहे. मोठमोठ्या व्यावसायिक इमारती उभारल्या असून, पार्किंग व्यवस्था मात्र अपुरी असल्याचे या ठिकाणी लक्षात येत आहे. आठवड्यात महापालिका अधिकारी, वाहतूक विभाग आणि पासपोर्ट कार्यालयाचे प्रतिनिधी यांच्यासह परिसराचा संयुक्त पाहणी दौरा केला जाईल. पाहणी अहवालाच्या आधारे सविस्तर मास्टर प्लॅन तयार करण्यात येईल.

# ओव्हरहेड केबल्सच्या विळख्यातून शहराची सुटका होणार

## महापालिकेचा 'अंडरग्राउंड-फर्स्ट' प्लॅन; अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना

**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या विद्रूपीकरणात भर घालणाऱ्या ओव्हरहेड केबलसाठी महापालिकेकडून अंडरग्राउंड-फर्स्ट धोरण राबविण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेने एक समिती स्थापन केली आहे. केबलवर नियंत्रण ठेवण्यासाठी समितीने कार्यपद्धती तयार केली आहे. शहरात मोठ्या प्रमाणात टाकण्यात आलेल्या या ओव्हरहेड केबल महापालिकेच्या परवानगीशिवाय जागा मिळेल तशा टाकण्यात आल्या आहेत.

परिणामी, शहर विद्रूपीकरणासह, लटकणाऱ्या केबलमुळे अपघातही होत आहेत. त्यामुळे, या केबल भूमीगत केल्यास महापालिकेचीही उत्पन्न वाढणार आहे. त्यासाठी स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पुढाकार घेत केबल विरोधात मोहीम सुरू केली आहे. यामुळे शहरात अनेक भागात इंटरनेट सेवाही विस्कळीत झाली असल्याने केबल टाकणाऱ्या कंपन्यांकडून या ओव्हरहेड केबलसाठी धोरण ठरवण्याची मागणी केली होती.



### नियंत्रण व कारवाई

» अनधिकृत ओव्हरहेड केबल्सवर कठोर कारवाई करण्यात येणार असून शहरात रेड आणि ग्रीन झोन निश्चित केले जाणार आहेत. स्ट्रीट लाईट पोलवर केबल टाकण्यासाठी विद्युत विभागाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल. या धोरणामुळे शहर अधिक सुरक्षित, सुबक आणि नियोजनबद्ध होण्यास मदत होईल, तसेच महापालिकेच्या उत्पन्नातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे या वादावर तोडगा काढण्यासाठी ही समिती नेमण्यात आली आहे. या समितीने अनधिकृत ओव्हरहेड केबल्सवर नियंत्रण आणण्यासाठी मानक कार्यपद्धती (एसओपी ) तयार केली असून ती महापालिका आयुक्तांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आली आहे.

समितीच्या अध्यक्षपदी अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) ओमप्रकाश दिवटे यांची नियुक्ती केली आहे. सदस्य म्हणून शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, प्रमुख मुख्य अभियंता (पथ) राजेश बनकर, मुख्य अभियंता (विद्युत) मनिषा शेकटकर, उप आयुक्त (आकाशचिन्ह व परवाना विभाग) माधव जगताप यांचा समावेश आहे. तसेच दूरसंचार विभाग (महाराष्ट्र शासन) यांचे संचालक आणि बीएसएनएल, व्होडाफोन आयडिया, रिलायन्स जिओ, भारती एअरटेल, टाटा टेलिकॉम यांचे प्रतिनिधी तसेच पेव टेक कन्सल्टंट यांचाही समितीत सहभाग आहे.

शक्यतो सर्व केबल्स अंडरग्राउंड टाकणे बंधनकारक राहील. मुख्य रस्त्यांवर ओव्हरहेड केबल्सना पूर्ण बंदी घालण्यात येणार असून केवळ अपवादात्मक परिस्थितीतच त्यांना परवानगी दिली जाईल. केबल टाकण्यासाठी मायक्रो-ट्रेन्चिंग आणि एचडीडी तंत्रज्ञान अनिवार्य करण्यात येणार असून ओपन कट हा शेवटचा पर्याय असेल. कामापूर्वी जीपीआर सर्वे करणे बंधनकारक असेल, तसेच महापालिकेच्या विद्यमान डक्टचा वापर करणे आवश्यक राहील.

सर्व परवानग्या ऑनलाइन सिंगल विंडो प्रणालीद्वारे देण्यात येणार असून अनधिकृत केबल्सवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच शहरात रेड व ग्रीन झोन निश्चित केले जाणार आहेत. स्ट्रीट लाईट पोलवर केबल टाकण्यासाठी विद्युत विभागाची पूर्वपरवानगी आवश्यक राहील.

### धोरणाची अंमलबजावणी

» शहरातील वाढत्या ओव्हरहेड केबल्समुळे निर्माण झालेल्या विद्रूपीकरण आणि अपघातांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने अंडरग्राउंड-फर्स्ट धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी विशेष समिती स्थापन करण्यात आली असून, केबल टाकण्यासाठी नवीन कार्यपद्धती (SOP) तयार करण्यात आली आहे. मुख्य रस्त्यांवर ओव्हरहेड केबल्सना पूर्ण बंदी घालण्यात येणार आहे. केवळ अपवादात्मक परिस्थितीतच त्यांना परवानगी दिली जाईल.

### तांत्रिक नियम व बंधने

» केबल टाकताना मायक्रो-ट्रेन्चिंग आणि एचडीडी (HDD) तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. ओपन कट पद्धत हा शेवटचा पर्याय असेल. तसेच काम सुरू करण्यापूर्वी जीपीआर (Ground Penetrating Radar) सर्वे करणे बंधनकारक राहील. महापालिकेच्या विद्यमान डक्टचा वापर करणे आवश्यक असून, सर्व परवानग्या ऑनलाइन सिंगल विंडो प्रणालीद्वारे देण्यात येणार आहेत.

---

# बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार; सुनेत्रा पवारांविरोधात न लढण्याचा निर्णय

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उमेदवारी मागे घेत असल्याचा निर्णय जाहीर केला.

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणुक बिनविरोध होण्यासाठी महायुतीसह शरद पवार गटाकडून तयारी सुरू होती. अखेर काँग्रेसने बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून माघार घेतली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज दुपारी पत्रकार परिषद घेऊन उमेदवारी मागे घेत असल्याचा निर्णय जाहीर केला.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. परंतु आज आकाश मोरे यांची उमेदवारी मागे घेण्यात आली आहे. पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे सकाळपासूनच राजकीय घडामोडींना वेग आला होता. अखेरच्या क्षणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेत असल्याचे जाहीर केले आहे.

हर्षवर्धन सपकाळ पत्रकार परिषदेत म्हणाले की, "बारामती नाही तर देशभरात भाजपच्या विरोधात काँग्रेसने भूमिका घेतली होती. एकूण सहा अर्ज बारामतीसाठी आले होते. वैचारिक भूमिका म्हणून भाजपला विरोध करण्यासाठी निवडणूकीत अर्ज भरला होता. रोहित पवारांनी भल्या पहाटे येऊन बारामतीची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विनंती केली.

सुनेत्रा पवार यांनी माझ्याशी फोनवर देखील संवाद साधला आणि त्यांनी विनंती केली की काँग्रेसने पोटनिवडणुकीतून माघार घ्यावी. काँग्रेसच्या राज्यातील विविध नेत्यांशी यासंदर्भात महायुतीच्या नेत्यांनी संपर्क साधला होता. सुप्रिया सुळे यांनी देखील फोनवरून माझ्याशी संवाद साधला. सुनेत्रा पवार यांनी देखील दिल्लीत आज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याशी भेट घेतली" असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### संस्कृती आणि संवेदना म्हणून माघार

» तर यावेळी हर्षवर्धन पवार यांनी पार्थ पवार यांनी काँग्रेसबाबत केलेल्या वक्तव्यावर, "काही जणांनी अपरिपक्व वक्तव्य केली. त्या संदर्भात कुटुंबांनी दिलगिरी व्यक्त केल्याचे सांगितले. पुढे सपकाळ म्हणाले, "शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी ही विनंती आणि सूचना दिल्या, यानंतर सर्व काँग्रेस नेतृत्व यांच्यासोबत चर्चा केली. लढलं पाहिजे ही आमची भूमिका आहे. मात्र संस्कृती आणि संवेदना म्हणून आम्ही बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेत आहोत, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.